मुख्य कार्यालय, विरार
विरार (प.),
ता.वसई, जि.पालघर - ४०१ ३०३.

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० – २५२५१०७
ई-मेल :vasaivirarcoporation@yahoo.com

जावक क्र: व.वि.श.म./घ.क.व्य/१२२१/२६
दिनांक : २८/१०/२०२६

प्रति,
विभाग प्रमुख,
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
वसई विरार शहर महानगरपालिका.

विषय :- स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीस देणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत स्वच्छता उपद्रव नियंत्रण व सार्वजनिक ठिकाणी तंबाखु, तंबाखुमिश्रीत पान सिगारेट, गुटखा, तंबाखुजन्य इतर पदार्थ इत्यादी खाण्यास, विक्रिस अथवा साठवणूक करणाऱ्या नागरीकांवर दंडात्मक कारवाई करणेकामी सन २०२६-२७, २०२७-२८ व २०२८-२९ या त्रैवार्षीक वर्षाकरिता स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) करून नोंदणीकृत महिला बचतगटांमार्फत महिला व आवश्यकतेनुसार पुरूष मार्शल तसेच नोंदणीकृत त्रृतीयपंथी बचतगटामार्फत / तृतीयपंथी संस्थेमार्फत Clean-Up Marshal म्हणून नियुक्ती करणेकामी मा. सर्व साधारण सभेची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार उपरोक्त कामाचे स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) प्रसिद्धीसाठी मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी, वरील कामासाठी दंडात्मक कारवाई करणेकरिता स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) फॉर्म शासनाच्या http://vvcmc.mahatender.gov.in व http://vvcmc.in या संकेतस्थळावर दि.२९/१०/२०२६ ते दि.१२/११/२०२६ रोजी पर्यंत प्रसिध्द करण्यात यावी.

(अर्चना दिवे)
उप-आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका

SCAN AnyScanner

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्यालय, विरार (प.)

(घनकचरा व्यवस्थापन विभाग)

जाहिर स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) सुचना

वसई विरार शहर महानरगपालिका मधील खालील नमूद कामासाठी मनपा क्षेत्रातील नोंदणीकृत नोंदणीकृत महिला बचतगटांमार्फत महिला व आवश्यकतेनुसार पुरूष मार्शल तसेच नोंदणीकृत त्रृतीयपंथी बचतगटामार्फत / तृतीयपंथी संस्थेमार्फत Clean-Up Marshal यांची नियुक्ती करणेकामी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मागविण्यात येत आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	कामाचे ठिकाण	इसारा रक्कम	फॉर्म फी	सुरक्षा अनामत	कामाची मुदत
१.	१.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (अ) पोट कलम (२) अन्वये : अ) सार्वजनिक स्वच्छता उपद्रव नियंत्रणासाठी प्रशासकीय शुल्क वसूल करणे. ब) सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, तंबाखू मिश्रित पान, सिगारट, गुटखा, तंबाखूजन्य इतर पदार्थ इ. खाण्यास विक्रीस अथवा साठवणूक करणेस प्रतिबंध करणे कामी दंड/शुल्क वसूल करणे. २.घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०२६ व दि.०१ जुले २०१९ रोजीची घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी अन्वये प्रशासकीय शुल्क वसूल करणे. ३.महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल व अविघटनशील वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतुक, हाताळणी, साठवणूक) अधिसुचना २०१८: पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१०/०७/२०१८ चे परिपत्रक: पर्यावरण व वातावरणीय विभाग, महाराष्ट्र शासन यांची दि. १५/०७/२०२२ रोजीची अधिसुचना: प्लास्टिक कचरा व्यवस्थापन व याबाबतचे सुधारीत नियमान्वये प्रशासकीय शुल्क वसूल करणे.	प्रभाग समिती A ते I मधील कार्यक्षेत्रासाठी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) भरावा	रु.१,००,०००/-	रु.५,०००/- + GST १८% = रु.५९००/-	रु.२,००,०००/-	कार्यादेश दिल्या पासून ३ वर्ष.

अटी व शर्ती :-

१. वरील कामाचे कोरे स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) फॉर्म https://vvcmc.maharashtra.etenders.in या संकेतस्थळावर खालील दिलेल्या कालावधीत उपलब्ध होईल.

अ.क्र.	तपशिल	सुरु दिनांक	वेळ
१	स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) प्रसिध्दी	२९/१०/२०२६	-
२	स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) डाऊनलोड करणे	२९/१०/२०२६	सकाळी ११.०० वाजे पासून
३	स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) ऑनलाईन भरणेचा अंतिम कालावधी	१२/११/२०२६	दुपारी ३.०० वाजेपर्यंत
४	ऑनलाईन स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) उघडण्याचा कालावधी	१२/११/२०२६	दुपारी ३.०१ वाजेपासून

SCAN AnyScanner

२. संस्थांनी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) फॉर्म फी व इसारा रक्कम व सेवा शुल्क ऑनलाईन पेमेंट **गेटवेद्वारे** भरावयाची आहे. यामध्ये सर्व शुल्क डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड, नेट बँकिंग, **RTGS, NEFT** मार्फत भरणा करता येतील. निविदा फॉर्म फी शुल्क व इसारा रक्कम रोखीने, धनादेश किंवा धनाकर्षाद्वारे वसई विरार शहर महानगरपालिकेत स्विकारली जाणार नाही.

३. कामाची ई-निविदा भरतेवेळी इच्छुक संस्थेने संपूर्ण कामाची माहिती घेऊन स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) सादर करावा. नमूद केलेल्या दर सर्व करांसहित असावेत.

४. स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) बाबत काहीही शंका असल्यास त्याचे निरासन **८८८८८६४३१७** या हेल्पलाईन वरुन करुन घ्यावे.

५. संस्थेने स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) भरतांना दोन लिफाफा पद्धतीचा अवलंब करावा. तसेच क्र. १ लिफाफ्यात तांत्रिक बाबींची कागदपत्रे व क्र. २ च्या लिफाफ्यामध्ये वित्तीय बाबींची कागदपत्रे स्कॅन करुन **PDF Format** मध्ये अपलोड करावीत. लिफाफा क्र. २ (वित्तीय बोली) चा लिफाफा उघडण्यापूर्वी लिफाफा क्र. १ (तांत्रिक बोली) चा लिफाफा मधील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे. त्याखेरीज लिफाफा क्र. २ उघडण्यात येणार नाही. स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) फॉर्ममधील सर्व अटी व शर्ती स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) सादर करताना बंधनकारक राहतील.

६. इतर सविस्तर अटी-शर्ती स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) फॉर्ममध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

७. स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) फॉर्ममध्ये आर्थिक प्रमाण नमूद करण्यात आले आहेत.

८. कारण नमूद करुन अथवा असे कारण न देता आलेल्या स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार मा. आयुक्त वसई विरार शहर महागनरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
(अर्चना दिवे)
उपायुक्त
घनकचरा व्यवस्थापन
वसई विरार शहर महानगरपालिका

जा.क्र.: वविशम/घ.क.व्य./9222**/२०२६.**
दि.2/ 10 **/२०२६**

स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) प्रपत्र फी रु. ५०००/- + GST १८% = रु.५,९००/-

प्रपत्रासोबत इसारा रक्कम रु. १,००,०००/-

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्यकार्यालय, विरार (प.),
ता. वसई, जि. पालघर
दूरध्वनी क्र. २५२५-१०१, १०२, १०३, १०७

सन २०२६-२७, २०२७-२८, २०२८-२९

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत स्वच्छता उपद्रव नियंत्रण व सार्वजनिक ठिकाणी तंबाखु, तंबाखुमिश्रीत पान सिगारेट, गुटखा, तंबाखुजन्य इतर पदार्थ इत्यादी खाण्यास, विक्रिस अथवा साठवणूक करणाऱ्या नागरीकांवर दंडात्मक कारवाई करणेकामी सन २०२६-२७, २०२७-२८ व २०२८-२९ या त्रैवार्षीक वर्षाकरिता स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) करून नोंदणीकृत महिला बचतगटांमार्फत महिला व आवश्यकतेनुसार पुरूष मार्शल तसेच नोंदणीकृत त्रृतीयपंथी बचतगटामार्फत / तृतीयपंथी संस्थेमार्फत Clean-Up Marshal म्हणून नियुक्ती करणेबाबत.

वसई विरार शहर महानगरपालिका संपूर्ण कार्यक्षेत्रामध्ये

प्रभाग समिती 'A ते I' करिता स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (अ) पोट कलम (२) अन्वये

अ) सार्वजनिक स्वच्छता उपद्रव नियंत्रणासाठी प्रशासकीय शुल्क वसूल करणे कामी महिला बचतगट / तृतीयपंथी संस्थांची नेमणूक करणे.

ब) सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, तंबाखू मिश्रित पान, सिगारेट, गुटखा, तंबाखूजन्य इतर पदार्थ इ. खाण्यास विक्रीस अथवा साठवणूक करणेस प्रतिबंध करणे कामी दंड/शुल्क वसूल करणेसाठी महिला बचतगट / तृतीयपंथी संस्थांची नेमणूक करणे.

२.घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०२६ व दि.०१ जूलै २०१९ रोजीची घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी अन्वये प्रशासकीय शुल्क वसूल करणे कामी महिला बचतगट / तृतीयपंथी संस्थांची नेमणूक करणे.

३.महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल व अविघटनशिल वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतुक, हाताळणी, साठवणुक) अधिसुचना २०१८; पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१०/०७/२०१८ चे परिपत्रक; पर्यावरण व वातावरणीय विभाग, महाराष्ट्र शासन यांची दि.१५/०७/२०२२ रोजीची अधिसुचना; प्लास्टिक कचरा व्यवस्थापन व याबाबतचे सुधारीत नियमान्वये प्रशासकीय शुल्क वसूल करणे कामी महिला बचतगट / तृतीयपंथी संस्थांची नेमणूक करणे.

AnyScanner

कामाचे नाव :-

१.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (अ) पोट कलम (२) अन्वये

अ) सार्वजनिक स्वच्छता उपद्रव नियंत्रणासाठी प्रशासकीय शुल्क वसूल करणे कामी महिला बचतगट / तृतीयपंथी संस्थांची नेमणूक करणे.

ब) सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, तंबाखू मिश्रित पान, सिगारेट, गुटखा, तंबाखूजन्य इतर पदार्थ इ. खाण्यास विक्रीस अथवा साठवणूक करणेस प्रतिबंध करणे कामी दंड/शुल्क वसूल करणेसाठी महिला बचतगट / तृतीयपंथी संस्थांची नेमणूक करणे.

वसूल करणेसाठी महिला बचतगट / तृतीयपंथी संस्थांची नेमणूक करणे.

२..घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०२६ व दि.०१ जूलै २०१९ रोजीची घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी अन्वये प्रशासकीय शुल्क वसूल करणे कामी महिला बचतगट / तृतीयपंथी संस्थांची नेमणूक करणे.

३.महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल व अविघटनशिल वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतुक, हाताळणी, साठवणुक) अधिसुचना २०१८; पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१०/०७/२०१८ चे परिपत्रक; पर्यावरण व वातावरणीय विभाग, महाराष्ट्र शासन यांची दि. १५/०७/२०२२ रोजीची अधिसुचना; प्लास्टिक कचरा व्यवस्थापन व याबाबतचे सुधारीत नियमान्वये प्रशासकीय शुल्क वसूल करणे कामी महिला बचतगट / तृतीयपंथी संस्थांची नेमणूक करणे.

कामाचा कालावधी :- कार्यादेशाच्या दिनांकापासून ३ वर्षे.

स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) नियम व अटी

सदर स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) प्रभाग समिती 'A ते I' साठी महिला बचतगट / तृतीयपंथी बचतगट यांनी भरावयाची आहे.

१) संस्थांनी त्यांचा स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) दोन लिफाफ्यात सादर कराव्यात.

२) स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) सादर करताना लिफाफा क्र.१ दरांचा व लिफाफा क्र.२ तांत्रिक लिफाफा स्वतंत्र पणे भरणे आवश्यक राहील.

३) अ. लिफाफा क्र. १ तांत्रिक लिफाफा मध्ये खालील साक्षांकित कागद पत्रे सादर करावीत.

१. इच्छुक महिला बचत गट / तृतीयपंथी संस्था या शासनाकडील किंवा महानगरपालिकेकडे नोंदणीकृत असल्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

२. बचत गट सदस्यांची संख्या किमान ५० असावी.

३. स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) फॉर्म फी भरलेल्या पावतीची प्रत.

४. इसारा रक्कम रु.१,००,०००/- भरणा केलेल्या पावतीची प्रत/धनाकर्ष.

५. स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) सोबत रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर परिशिष्ट—१ प्रमाणे प्रतिज्ञापत्र लिहून द्यावयाचे आहे.

SCAN AnyScanner

१४. स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) सोबत रु.५००/- स्टॅम्प पेपरवर सत्यपतिज्ञापत्र-२ प्रमाणे लिहून द्यावयाचे आहे.

१५. स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) सोबत रु.५००/- स्टॅम्प पेपर वर सत्यपतिज्ञापत्र-३ प्रमाणे शपथपत्र लिहून द्यावयाचे आहे.

१६. स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) सोबत अर्जदाराचे हमीपत्र लिहून द्यावयाचे आहे.

१७. स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) सोबत अर्जदाराने महापालिकेला महसुल वाटा म्हणून एकुण उत्पन्नाच्या (____)% देण्यात येणारे आर्थिकप्रमाण-५ मध्ये लिहून द्यावयाचे आहे.

३)ब. लिफाफा क्र. २ (दरा संबंधीचा लिफाफा)

१) संस्थेने कर्मचाऱ्यांचे वेतन, लागणारे साहित्य व आवश्यकती सर्व वाहने (उदा. जीप, टोईंगव्हॅन, रिक्शा, टेंपो, मोटारसायकल इ.) या कामी येणाऱ्या सर्व खर्चाचा विचार करुन तीन वर्षासाठीचा दर नमूद करावयाचा आहे.

४) स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) लिफाफा क्र. १ मधील सर्व कागदपत्रांची यादी निविदा काराने त्यांचे लेटरहेडवर अनुक्रमांक नमूद करुन (INDEX निहाय) स्कॅन करुन जोडण्यात यावी.

५) मंजुर संस्थेस कामाच्या वेळी संबंधित प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त व वरिष्ठ आरोग्य निरिक्षक यांच्याशी समन्वय ठेवणे आवश्यक राहील.

६) मंजूर झालेल्या संस्थेस सब कॉन्ट्रॅक्टर नेमून निविदेचे काम करता येणार नाही. तशी बाब निदर्शनास आल्यास देण्यात आलेला वार्षिक ठेका त्याचवेळी १५ दिवसांची नोटीस देऊन रद्द करुन त्यांचे विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तसेच निविदाकाराची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

७) सदरचे काम संस्थेला कोणत्याही परिस्थितीत वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय मुदती पूर्वी बंद करता येणार नाही अथवा एक तर्फी कंत्राट सोडून देता येणार नाही. तसे केल्यास निविदाकाराची अनामत रक्कम जप्त करणेत येवून त्यांचे नाव काळ्या यादीत टाकण्यात येईल.

८) ठेक्याची रक्कम अनिश्चित असल्याने निवड केलेल्या संस्थेस महापालिके बरोबर ठरवून दिलेल्या कामाचा करारनामा आवश्यक रक्कमेच्या स्टॅम्प पेपर वर करुन नोटरी/नोंदणी मा. आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका यांना करुन द्यावा लागेल व त्यानंतरच कार्यादेश देण्यात येईल.

९) संस्थेचा देकार प्रशासनास योग्य न वाटल्यास स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) रद्द करण्याचा अधिकार प्रशासनास राहील.

१०) स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मंजूर झाल्या नंतर संस्थेने रु.२,००,०००/- इतकी रक्कम सुरक्षा अनामत स्वरुपात मनपा कडे एका महिन्यात महापालिका खजिन्यात भरावी लागेल व नंतर संस्थेस आवश्यकते प्रमाणे लागणाऱ्या संबंधित पावती पुस्तकापैकी महानगरपालिकेस देय असणाऱ्या रक्कमेचा भरणा करुन केवळ महानगरपालिकेने छापलेली पावती पुस्तके वापरावी लागतील व त्यांचाच प्रत्यक्ष शुल्क वसुलीसाठी वापर करणे बंधनकारक राहील. सुरक्षा अनामत रक्कमेवर किंवा इसारा रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

SCAN AnyScanner

११) संस्था काम करीत असताना कामावर ठेवलेल्या कामगारांना कोणत्याही प्रकारे शारीरिक, आर्थिक अथवा जीवित हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेवर राहील. महापालिका त्यास जबाबदार राहणार नाही अथवा कोणत्याही प्रकारचा मोबदला या संदर्भात महापालिकेकडून दिला जाणार नाही.

१२) कामगारांना साप्ताहिक सुट्टी देण्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील. त्या करिता उपलब्ध कामगारांमध्ये तशी तरतूद करण्याची व त्याप्रमाणे आवश्यक कामगार नेमण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

१३) संस्थेने नेमलेल्या कामगाराचा किमान वेतन कायद्या नुसार पगार, रजा, ग्रॅच्युईटी, बोनस, आयुर्विमा, भविष्यनिर्वाहनिधी (पी.एफ.) व राज्यकामगार विमायोजना (ई.एस.आय.एस.) इत्यादी लागू असणाऱ्या देयबाबी देण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. या बाबत महापालिकेची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. तसेच या संस्थेबरोबर कामगारांमध्ये काही तंटा निर्माण झाल्यास महापालिका कोणताही हस्तक्षेप करणार नाही. त्या सर्व कायदेशीरबाबींचा निपटारा करण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

१४) मंजूर झालेल्या संस्थेने कामगारांना ओळखपत्र, गडद रंगाचे गणवेश, पावसाळी रेनकोट, बूट देणे बंधनकारक राहील. तसेच रजिस्टर अद्यावत करुन त्यामध्ये संबंधित कामगारांचे नाव, अलीकडच्या काळातील रंगीत पासपोर्ट साईजचे फोटो, जन्म तारीख, आधारकार्डाची प्रत व संपूर्ण पत्ता असणे आवश्यक आहे. सदर ओळखपत्र दर्शनी भागात लावावे लागेल अन्यथा प्रती कर्मचारी रु.५००/-दंड आकारण्यात येईल.

१५) संस्थेने नेमलेल्या कामगारांना दंड/शुल्क वसुलीचे काम करता येईल. त्यांच्या व्यतिरीक्त इतर व्यक्ती दंड/शुल्क वसुली करित असल्याचे आढळल्यास संस्थेवर व संबंधित व्यक्ती वर कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

१६) मंजुर संस्थेने आपल्या कामगारांचे पोलिस चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र (कॅरेक्टर सर्टिफीकेट) सादर करावे लागेल.

१७) प्रचलित शासन निर्णय/ आदेश /निर्देश /परिपत्रक यांची पूर्तता करण्याची जबाबदारी सर्वस्वी संस्थेवर राहील.

१८) संस्थेवर प्रचलित शासकीय नियमानुसार वेळोवेळी घ्यावे लागणारे नोंदणी प्रमाणपत्र, परवाने त्या-त्या संबंधित कार्यालयाकडून स्वत:च्या जबाबदारीने घ्यावे लागतील.

१९) दंड/शुल्क वसुलीच्या कामात महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आलेली पावती न फाडता विहीत शुल्क/दंड यापेक्षा कमी रक्कम घेणे, त्याचा भरणा महापालिकेत न करणे या व अशा स्वरुपाच्या आर्थिक गैरव्यवहार, कामगारांची गैर वर्तवणूक इत्यादी बाबत तक्रारी प्राप्त झाल्यास व त्यात खरे पणा आढळल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता मंजुर संस्थेचा ठेका त्याच वेळी कोणतीही पूर्वसुचना न देता रद्द करुन त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तसेच संस्थेची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२०) कामाच्या वेळा तीन पाळयामध्ये २४X७ अशी व मनपास आवश्यकते नुसार त्यामध्ये बदल करता येतील. सर्व साधारणपणे सकाळी ०७.०० ते दुपारी ०३.००, दुपारी ०३.०० ते रात्री ११.०० व रात्री ११.०० ते सकाळी ०७.०० अशा राहतील.

२१) संस्थेने नेमलेल्या कोणत्याही कामगारास मनपा सेवेत सामावून घेतले जाणार नाही व कामगारांबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याचा कायदेशीर निपटारा करणेची संपूर्ण जबाबदारी संस्थेवर राहील.

SCAN AnyScanner

२२) सार्वजनिक रस्ता, फुटपाथवरील फेरीवाले व तत्सम अतिक्रमणे दुर करावयाची आहेत व जप्त केलेले साहित्य संबंधीत सहा. आयुक्त नमुद करतील त्या ठिकाणी जमा करावयाचे आहे. तसेच संबंधित सहा. आयुक्त अथवा मनपाने या कामासाठी नेमणूक केलेल्या अधिका-याचे निर्देशान्वये कार्यवाही पार पाडावयाची आहे.

२३) कोणतेही स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) अंशत: वा पूर्णत: स्विकारणे वा पूर्णत: नाकारणे अथवा रद्द करणे याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे. त्यासाठी कोणतेही कारण दिले जाणार नाही.

२४) वरील अटींचा कोणत्याही प्रकारचा भंग झाल्यास करार कायम ठेवण्याचा अथवा रद्द करण्याचा अथवा अटींमध्ये यथायोग्य बदल करण्याचा पूर्ण अधिकार मा. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना राहील.

वर नमूद केलेली तांत्रिक माहिती व त्याबाबतच्या मूळ प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती तांत्रिक बोली लिफाफा क्र.१ मध्ये सादर केली नसेल तर स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) ग्राह्य धरली जाणार नाही.

सहा. आयुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग वसई विरार शहर महानगरपालिका	उपायुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग वसई विरार शहर महानगरपालिका

वरील सर्व तपशील मी/आम्ही काळजी पूर्वक वाचला असून त्या मला/आम्हाला त्यातील सर्व नियम व अटी पूर्णपणे मान्य व बंधनकारक आहेत. सदर निविदा मी प्रभाग समिती 'A ते I' साठी सादर करीत आहे.

सहभागी संस्थेचे नाव

दिनांक:-

सही
शिक्का

SCAN AnyScanner

स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) प्रपत्र फी रु.५०००/- + GST १८% = रु.५९००/-

वसई-विरार शहर महानगरपालिका

स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) प्रपत्र

१) संस्थेचे नाव :- ----------

पत्ता :- ----------

दूरध्वनी क्र. :- ----------, मोबाईल क्र.:----------

ई-मेल आयडी :- ----------

२)आय कर विवरण पत्र दाखल :- ----------

कामाचा तपशील नोंदवावा

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (अ) पोट कलम (२) अन्वये

अ) सार्वजनिक स्वच्छता उपद्रव नियंत्रणासाठी प्रशासकीय शुल्क वसूल करणे कामी महिला बचतगट / तृतीयपंथी संस्थांची नेमणूक करणे.

ब) सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, तंबाखू मिश्रित पान, सिगारेट, गुटखा, तंबाखूजन्य इतर पदार्थ इ. खाण्यास विक्रीस अथवा साठवणूक करणेस प्रतिबंध करणे कामी दंड/शुल्क वसूलकरणेसाठी महिला बचतगट / तृतीयपंथी संस्थांची नेमणूक करणे.

२. घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०२६ व दि.०१ जूलै २०१९ रोजीची घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी अन्वये प्रशासकीय शुल्क वसूल करणे कामी महिला बचतगट / तृतीयपंथी संस्थांची नेमणूक करणे.

३. महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल व अविघटनशिल वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतुक, हाताळणी, साठवणुक) अधिसुचना २०१८; पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१०/०७/२०१८ चे परिपत्रक; पर्यावरण व वातावरणीय विभाग, महाराष्ट्र शासन यांची दि. १५/०७/२०२२ रोजीची अधिसुचना; प्लास्टिक कचरा व्यवस्थापन व याबाबतचे सुधारीत नियमान्वये प्रशासकीय शुल्क वसूल करणे कामी महिला बचतगट / तृतीयपंथी संस्थांची नेमणूक करणे.

अ.क्र.	तपशिल	कायदेशिर तरतूद	वसुल करावयाच्या प्रती प्रकरणासाठी शुल्काची रक्कम
१.	सार्वजनिक जागेत अस्वच्छता पसरविणे	घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०२६ व दि.०१ जूलै २०१९ रोजीची घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी अन्वये	रु.२००/-
२.	खाजगी मालमत्तेच्या जागी कचरा टाकणे		रु.२००/
३.	वाहनांतून फेकला जाणारा कचरा		रु.२००/
४.	वाहतुकीच्या वाहनांतुन फेकला जाणारा कचरा		रु.२००/
५.	सार्वजनिक ठिकाणी आंघोळ करणे		रु.१००/-
६.	सार्वजनिक ठिकाणी थुंकणे		रु.२००/-
७.	सार्वजनिक ठिकाणी मलमूत्र विसर्जित करणे		रु.२००/-
८.	सार्वजनिक ठिकाणी प्राणी किंवा पक्ष्यांना खाण्यास देणे		रु.५००/-

SCAN AnyScanner

अ.क्र.	तपशिल	कायदेशिर तरतूद	वसुल करावयाच्या प्रती प्रकरणासाठी शुल्काची रक्कम
९.	सार्वजनिक ठिकाणी वाहने, अन्य कोणत्याही वस्तू दुरुस्त करणे		रु.५००/-
१०.	ओला व सुका कचरा वर्गिकरण करून न देणे. (निवासी व वाणिज्य आस्थापना)		रू. २००/- (पहिला प्रसंग) रू. ३००/- (पुढील प्रत्येक प्रसंगी)
११.	मोठ्या प्रमाणावरील कचरा निर्माण करणारे जनक (BWGs) यांचेमार्फत ओला व सुका कचरा वर्गिकरण करून न देणे.		रू. ३०००/- (पहिला प्रसंग) रू. ९०००/- (पुढील प्रत्येक प्रसंगी
१२.	मोठ्या प्रमाणावरील कचरा निर्माण करणारे जनक (BWGs) यांचेमार्फत ओला व सुका कचरा वर्गिकरण न करणे व सार्वजनिक ठिकाणी टाकणे. (अधिकांश कचरा उत्पादक BWG म्हणजे मालक, दुकानदार, भोगवटादार, गृहनिर्माण संस्था किंवा संकुलाचा मालक किंवा भोगवटादाराच्या वतीने प्रतिनिधित्व करणारी कोणतीही व्यकी, उपहारगृह, हॉटेल्स, बाजार, फेरीवाले, दवाखाने, औद्योगिक मालमत्ता आणि व्यापारी संकुले/मॉल्स, शैक्षणिक संस्था यामध्ये कोणतीही सरकारी किंवा सार्व. कार्यालये, इमारत किंवा अन्य वापरकर्ते जसे क्लब, जिमखाने, युवा कार्यालये, शैक्षणिक संकुले, इस्पितळे इत्यादी व्यवसायाचा कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकणे.		रू. १०००/- (पहिला प्रसंग) रू. ३०००/- (पुढील प्रत्येक प्रसंगी
१३.	प्रक्रिया न केलेला जैव वैद्यकीय कचरा साठवणूक करणे.		१० किलो - रू. ५०/- १० ते ५०० किलो - रू. १०/- प्रति किलो
१४.	बांधकाम आणि निष्कासनातून निर्माण होणारा कचरा, दगड, माती, राडा-रोडा, वाळू, विटा सार्वजनिक ठिकाणी टाकणे.		एक ब्रास दगड, माती, राडारोडा वाळू, रू. २५००/- प्रमाणे विटा नग १ ते १००० नग रू. २५००/- विटा नग १००० नग ते अधिक रू. २५००/- प्रमाणे.
१५.	सुका कचरा साठवणूक करणे.		रु.१००/-
१६.	खाजगी इमारतीमधील मोठी उद्याने आणि बागबगीचा मधील कचरा तसेच खाजगी मोकळया जागेत कचरा टाकणे व साठविणे.		रु.३००/-
१७.	रस्त्याच्या कडेला किंवा कोणत्याही खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेच्या ठिकाणी कोणत्याही प्रकाराचा घन कचरा जाळणे.		रू.५०००/-
१८.	कोंबडया, मासळी, कत्तलीचा कचरा		पहिल्या १० किलो साठी रू.५००/- व त्या पुढील रू. २० प्रमाणे प्रति किलो.
१९.	सार्वजनिक स्वच्छता उपद्रव नियंत्रणासाठी मोकळया जागी/दुकानाबाहेर उघड्यावर मांस विक्री केल्यास		रू. ३०००/-
२०.	सर्व विक्रेते/फेरीवाले, त्यांनी तयार केलेला जैविक कचरा व इतर कचरा		रु.५००/-
२१.	सार्वजनिक ठिकाणी अथवा सार्वजनिक रस्त्यावर मालकीच्या/पाळीव प्राण्यांपासून होणारा कचरा		रु.२००/-
२२.	रस्त्यावर वाहने उभी केल्यास सदर वाहनाखालची जागा अथवा रस्त्याचा भाग साफ न करणे		रु.२००/-
२३.	महापालिकेची परवानगी न घेता भितीवर भितीपत्रके अथवा चित्रे लावणे		एक पोस्टर बॅनरसाठी रु.२००/-
२४.	सार्वजनिक रस्ता/फुटपाथ गटारी वर अतिक्रमण करुन अस्वच्छता निर्माण करणे.		रु.१,०००/-
२५.	प्रत्येक पानपट्टीधारकाने स्वतंत्र कचरा पेटी ठेवणे आवश्यक		रू. २००/-
२६.	सार्वजनिक रस्त्यावर वाहने उभी करून रहदारीला अडथळा निर्माण केल्यास आकाराबयाच्या दंडाची रक्कम		रू. १०००/-

अ.क्र.	तपशिल	कायदेशिर तरतूद	वसुल करावयाच्या प्रती प्रकरणासाठी शुल्काची रक्कम
२७.	सेप्टिक टँक मधला मलजल अनधिकृतपणे उघड्यावर टाकणे.	हागणदारी मुक्त (ODF) च्या मार्गदर्शिकानुसार	रू. ५०००/- (पहिला प्रसंग) रु. १०,०००/- (पुढील प्रत्येक प्रसंगी)
२८.	१२० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे व हँडल असलेले सर्व प्रकारचे प्लास्टिक पिशव्या, प्लास्टिकचे आवरण असलेले सर्व प्रकारचे एकल वापर डिस्पोसेबल वस्तु (ताट, ग्लास, ताटे, चमचे, काटे, वाटी इ.), अन्न पदार्थ पॅकेजिंगसाठी वापरले जाणारे वस्तु, नॉनओव्हन पॉलिप्रॉपिलेन बॅग्स, थर्माकॉल (पॅकेजिंग वगळून) इ. वस्तुंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतुक, साठवणुक करणारे	महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल व अविघटनशिल वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतुक, हाताळणी, साठवणुक) अधिसुचना २०१८; पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१०/०७/२०१८ चे परिपत्रक; पर्यावरण व वातावरणीय विभाग, महाराष्ट्र शासन यांची दि. १५/०७/२०२२ रोजीची अधिसुचना; प्लास्टिक कचरा व्यवस्थापन व याबाबतचे सुधारीत नियमान्वये	रू. ५०००/- (पहिला प्रसंग) रू. १०,०००/- (दुसरा प्रसंग) रू. २५,०००/- व ३ महिने कारावास (तिसरा प्रसंग)

सहाय्यक आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका

उपायुक्त
घनकचरा व्यवस्थापन विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका

वरील सर्व तपशील मी/आम्ही काळजी पूर्वक वाचला असून त्या मला/आम्हाला त्यातील सर्व नियम व अटी पूर्ण पणे मान्य व बंधन कारक आहेत.

सहभागी संस्थेचे नाव

दिनांक:- / / **सही** **शिक्का**

परिशिष्ट-१

प्रतिज्ञापत्र

रु. ५०० चे स्टॅम्प पेपरवर

मी/आम्ही याद्वारे असे नमुद करतो की, मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० व कलम ११ तरतुदीच्या ज्या खाली उतधृत केलेल्या आहेत याची मला/ आम्हाला माहीती आहे आणि गंभीर पणे नमुद करतो की, महानगरपालिकेशी किंवा महानगरपालिकेच्या अधिन किंवा महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविदे मध्ये महानगरपालिकेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा आमच्याशी भागीदारी नाही.

[कलम१०:-या पुढे तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त, महानगरपालिकेच्या आदेशावरुन केलेल्या कोणत्याही कामात किंवा, महानगरपालिकेशी किंवा अधिन किंवा महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदे मध्ये जीचा स्वत:चा किंवा आपल्या भागीदारा मार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल.]

[कलम११:-पालिका सदस्य म्हणून किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून ज्याकोणत्याही बाबतीत कलम १० व ११ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्यांच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीतीने कोणताही हिस्सा किंवा हित संबंध असेल मग अश्या हिश्याची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो, किंवा जीत ज्याचा अशीलाच्या, प्रकर्त्यांचा किंवा इतर व्यक्तीच्या वतीने व्यवसायीक दृष्टया त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.]

सहभागी संस्थेचे नाव:-

सहभागी संस्थेची सही

पत्ता:

दिनांक

साक्षीदाराचे नाव:-

साक्षीदाराची सही

पत्ता:-

दिनांक:-

SCAN AnyScanner

सत्यप्रतिज्ञापत्र -२

नमुना सत्यप्रतिज्ञापत्र (रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर)
सत्यप्रतिज्ञापत्र (Affidavit)

मी_____वय वर्षे_____राहणार _____या सत्यप्रतिज्ञा पत्राद्वारे लिहून देतो की, मी_____ या फर्मचा / कंपनीचा मालक असून_____या कामासाठी निविदा सादर करीत आहे. त्या निविदेच्यालिफाफा क्र.१ मध्ये जो कागदपत्रे सादर केली आहेत ती खरी, बरोबर व पूर्ण आहेत.त्यामध्ये कोणत्याही त्रुटी, चुका नाहीत. याची मी खात्री केलेली असून असे शपथपूर्वकखालील अटी व शर्तीसह मान्य करीत आहे. या कागदपत्रांमध्ये काही चुकीची दिशाभुलकरणारी, खोटी व तसेच अपूर्ण माहिती आढळल्यास मी भारतीय दंडसंहिता अंतर्गतकायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

१. जर कंत्राट कालावधीदरम्यान, मी, माझ्या कार्यालयाने किंवा माझ्या कर्मचाऱ्यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाला कोणतीही खोटी माहिती किंवा देयकासमवेत तसेच पत्रव्यवहारात खोटी / बनावट क्लिन-अप मार्शलची कागदपत्रे सादर केली असल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.
२. जर कंत्राट कालावधी दरम्यान आणि काम समाप्ती नंतर, अंतिम देयक देण्याच्या तारखेपर्यंत सादर केलेले कोणतेही कागदपत्रे खोटी / बनावट किंवा फसवी आढळल्यास, मी भारतीय दंडसहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.
३. जर काम समाप्तीनंतर दोष दायित्व कालावधी दरम्यान किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी / बनावट, फसवी किंवा दिशाभुल करणारीआढळल्यास, मी भारतीय दंडसहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

SCAN AnyScanner

सत्यप्रतिज्ञापत्र -३

मी शपथपुर्वक जाहिर करतो की, महानगरपालिका सार्वजनिक रस्ते साफसफाई प्रभाग समिती._____ करीता क्र.वविशम/आरोग्य /२०२६ दि. / /२०२६ अन्वये मागविण्यात आलेल्यानिविदेकरीता मी निविदा सादर करत असून माझी संस्था राज्यात व देशात कुठेही काळया यादीत टाकण्यात आल्याची प्रक्रिया झालेली नाही. तसेच कुठेही राज्यात/देशात Arbitrator Act १९९६ मधीलतरतुदीनुसार सुनावणी मध्ये दोषी ठरविण्यात आलेले नाही. सदरची माहिती खोटी आढळून आल्यास मी फौजदारी गुन्हयास पात्र राहील.

SCAN AnyScanner

अर्जदाराचे हमीपत्र -४

१) माझ्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाख रुपयांपेक्षा अधिक नाही.

२) माझ्याकडे उत्पन्न प्रमाणपत्र नसल्याने मला पिवळे किंवा केशरी रेशनकार्ड आधारे उत्पन्न प्रमाणपत्रातून सूट देण्यात यावी.

३) माझ्या कुटुंबातील सदस्य आयकरदाता नाही.

४) मी स्वतः किंवा माझ्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग / उपक्रम/ मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नाही किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत नाही.

५) मी बाह्य यंत्रणांद्वारे कार्यरत असलेली कर्मचारी / स्वयंसेवी कामगार / कंत्राटी कर्मचारी असून माझे उत्पन्न रु. २.५० लाख पेक्षा कमी आहे.

६) मी शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या दरमहा रु.१,५००/- किंवा त्यापेक्षा अधिक रकमेचा आर्थिक योजनेचा लाभ घेतलेला नाही.

७) माझ्या कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार/आमदार नाही.

८) माझ्या कुटुंबातील सदस्य भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या बोर्ड/ कॉर्पोरेशन/ बोर्ड/ उपक्रमाचे अध्यक्ष /उपाध्यक्ष /संचालक /सदस्य नाहीत.

९) माझ्याकडे किंवा माझ्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर चारचाकी वाहने (ट्रक्अर वगळून) नोंदणीकृत नाहीत.

१०) माझ्या कुटुंबात एकापेक्षा जास्त अविवाहित महिलेने या योजनेचा लाभ घेतलेला नाही.

मी वरीलप्रमाणे घोषित करते की, "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजना संबंधित पोर्टल ॲपवर आधार क्रमांक आधारित प्रमाणीकरण प्रणाली सोबत स्वतःला प्रमाणित करण्यास व आधार आधारित प्रमाणीकरणानंतर माझा आधार क्रमांक, बायोमेट्रीक किंवा वन टाइम पीन (OTP) माहिती प्रदान करण्याची सहमती देण्यात माझी हरकत नसेल. मी हे देखील सहमती देते की, "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजना माझी ओळख पटवण्यासाठी व प्रमाणित करण्यासाठी माझ्या आधार क्रमांकाचा वापर करु शकतात. मी केवळ शासकीय सेवा व योजनांचे लाभ प्राप्त करण्याच्या उद्देशाने अन्य राज्य किंवा केंद्र शासनाच्या विभागांशी माझे आधार ई-केवायसी (e-KYC) वर्णन पुरवण्यास सहमती देत आहे.

(अर्जदाराचे नाव व सही)

SCAN AnyScanner

आर्थिक प्रमाण -५

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत स्वच्छता उपद्रव नियंत्रण व सार्वजनिक ठिकाणी तंबाखु, तंबाखुमिश्रीत पान सिगारेट, गुटखा, तंबाखुजन्य इतर पदार्थ इत्यादी खाण्यास, विक्रिस अथवा साठवणूक करणाऱ्या नागरीकांवर दंडात्मक कारवाई करणेकामी सन २०२६-२७, २०२७-२८ व २०२८-२९ या त्रैवार्षीक वर्षाकरिता स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) करून नोंदणीकृत महिला बचतगटांमार्फत महिला व आवश्यकतेनुसार पुरूष मार्शल तसेच नोंदणीकृत त्रृतीयपंथी बचतगटामार्फत / तृतीयपंथी संस्थेमार्फत Clean-Up Marshal म्हणून नियुक्ती करणेबाबत.

अ.क्र.	कामाचे नाव	महसुलापैकी महापालिकेची टक्केवारी	महसुलापैकी संस्थेची टक्केवारी
१.	१.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (अ) पोट कलम (२) अन्वये : अ) सार्वजनिक स्वच्छता उपद्रव नियंत्रणासाठी प्रशासकीय शुल्क वसूल करणे. ब) सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, तंबाखू मिश्रित पान, सिगारेट, गुटखा, तंबाखूजन्य इतर पदार्थ इ. खाण्यास विक्रीस अथवा साठवणूक करणेस प्रतिबंध करणे कामी दंड/शुल्क वसूल करणे. २.घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०२६ व दि.०१ जूले २०१९ रोजीची घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी अन्वये प्रशासकीय शुल्क वसूल करणे. ३. महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल व अविघटनशिल वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतुक, हाताळणी, साठवणुक) अधिसुचना २०१८; पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१०/०७/२०१८ चे परिपत्रक; पर्यावरण व वातावरणीय विभाग, महाराष्ट्र शासन यांची दि. १५/०७/२०२२ रोजीची अधिसुचना; प्लास्टिक कचरा व्यवस्थापन व याबाबतचे सुधारीत नियमान्वये प्रशासकीय शुल्क वसूल करणे.		

AnyScanner